दिनांक २८/०१/२०२२

# -:- प्रेसनोट-:-

**फिर्यादी यांचे ग्रामपंचायत अंतर्गत पेव्हर ब्लॉकच्या कामाचे बिलाचे पैसे (चेक) ग्रामपंचायतीच्या खात्यातुन काढून देण्यासाठी रुपये 40,000/- ची मागणी करुन चेकद्वारे रुपये 35000/- ADCC बँक शिऊर येथुन काढून घेतल्याने आलोसे श्री. वसंत सिताराम इंगळे, वय 42 वर्षे, पद-ग्रामसेवक (वर्ग-3) गृप ग्रामपंचायत निमगोंदगाव ता.वैजापुर जिल्हा औरंगाबाद यांना रक्कम काढल्यानंतर ताब्यात घेऊन गुन्हा नोंद.**

| | | |
|---|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | :- | औरंगाबाद |
| गुन्हा नोंद क्रं. | :- | 22/2022 |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे कलम | :- | पोलीस ठाणे-शिऊर, औरंगाबाद ग्रामीण येथे येथे गु.र.नं. 22/2022 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |
| आलोसे यांचे नाव हुद्दा व पत्ता | :- | श्री. वसंत सिताराम इंगळे, वय 42 वर्षे, पद-ग्रामसेवक (वर्ग-3) गृप ग्रामपंचायत निमगोंदगाव ता.वैजापुर जिल्हा औरंगाबाद. |
| लाच मागणी रक्कम | :- | 40000/- रुपये |
| लाच स्विकृती रक्कम | :- | चेक द्वारे 35000/-रुपये |
| तपास अधिकारी | :- | श्री. शुभांगी सुर्यवंशी, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद |
| थोडक्यात माहिती | :- | यातील तक्रारदार यांनी निमगोंदगांव गृप ग्रामपंचायत अंतर्गत सन 2020 मध्ये शिवाजी महाराज पुतळयाचे व पेव्हर ब्लॉक बसविण्याचे काम केले. केलेल्या कामाचे बील काढून देण्यासाठी ग्रामसेवक इंगळे यांना भेटले असता त्यांनी बील काढून देण्यासाठी 60000/- ची मागणी केली.<br>फिर्यादी यांना लोकसेवकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी दि. 17/1/2021 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग औरंगाबाद या कार्यालयात तक्रार दिली, फिर्यादीच्या तक्रारीवरुन दि.17/1/2022 रोजी केलेल्या पडताळणी दरम्यान आलोसे यांनी फिर्यादी यांना रुपये 40000/- लाचेची मागणी करीत असलेबाबत निष्पन्न झाले.<br>सदर तक्रारीचे अनुषंगाने परत सापळा पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांना देण्यासाठी ठेवलेला चेक उपसरपंच/ग्रामसेवक निमगोंदगांव या नावाने ADCC बँक शाखा शिऊर येथे वटवुन 40000/-रुपये लाचेच्या मागणीच्या रकमेतुन 5000/- रुपये कमी करुन रुपये 35000/- लाचेची रक्कम ही परस्पर काढुन घेतली आलोसे यांना ताब्यात घेण्यात आले आहे. त्यांचे विरुद्ध पोलीस ठाणे शिऊर, औरंगाबाद ग्रामीण येथे गु.र.नं. 22/2022 कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. |

सदर कारवाई, पोलीस अधीक्षक मा.डॉ.राहुल खाडे, अपर पोलीस अधीक्षक मा. विशाल खांबे, पोलीस उप अधिक्षक श्री. मारुती पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक- श्री. शुभांगी सुर्यवंशी, यांनी कारवाई केली आहे. त्यांना सदरच्या कारवाई कामी पोअं-सुनिल पाटील, नागरगोजे, सी.एन.बागुल यांनी मदत केली आहे.

**लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.**


| | |
|---|---|
| **संपर्क पत्ता** | :- **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद** |
| **ई- मेल** | :- sp1acbaurangabad@gmail.com, 2) dyspacbabad@gmail.com |
| **ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन** | :- acbmaharashtra.net |
| **फेसबुक** | :- www.facebook.com-Maharashtra.gov.in |
| **संपर्क क्रं.** | :- 0240-2344050, **टोल फ्रि क्रं.** 1064, |
| **पोलीस अधीक्षक** | :- 8888807299 |
| **अपर पोलीस अधीक्षक** | :- 8788644994 |

२८.०१.२२

**(मारुती शंकर पंडित)**
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
औरंगाबाद